# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प)

---

## महा मेट्रोत आरक्षण संबंधी नियमांचे तंतोतंत पालन, रोजगारात स्थानिकांना प्राधान्य

नागपूर: शासनाने विविध स्तरांवर कर्मचाऱ्यांच्या भरतीदरम्यान आरक्षणाचे धोरण लागू केले असून महा मेट्रोने विविध स्तरांवर भरती करताना सर्व निर्धारित नियम आणि कार्यपद्धतींचे नेहमीच पालन केले आहे. एकीकडे आरक्षणाच्या धोरणांचे पालन करताना त्या सोबतच रोजगार देताना स्थानिकांना देखील मेट्रोने प्राधान्य दिले आहे. महा मेट्रोत भरती होणारे सुमारे ९० % पेक्षा जास्त कर्मचारी स्थानिक आहेत.

महा मेट्रोच्या भरती प्रक्रियेवर दोन वेगवेगळ्या वैधानिक संस्थांनी समाधान व्यक्त केले आहे. या संस्थांनी मेट्रो कार्यालयाला भेट दिली आहे आणि महा मेट्रोमध्ये आरक्षण धोरण ज्या प्रकारे लागू केले जात आहे त्यावर समाधान व्यक्त केले आहे. महा मेट्रोत आरक्षण निकषांचे आणि नियमांचे किती गांभीर्याने पालन होते याचा हा एक मोठा पुरावा आहे.

राष्ट्रीय अनुसूचित जनजाति आयोगाने 2018 ला, राज्य अनुसूचित जाति समितिने 2019 साली आणि महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास खात्याने 2021 मध्ये महा मेट्रोच्या रोस्टरची तपासणी करत या सर्व बाबींवर समाधान व्यक्त

करत महा मेट्रो तर्फे झालेल्या भर्तीत कुठल्याही प्रकारचा आक्षेप नोंदविला नाही.

महा मेट्रो तर्फे २०० गुणांच्या रोस्टर पद्धतीचे पालन केले जाते आणी केंद्र तसेच राज्य सरकारच्या कॅडर आधारित आरक्षण धोरणाचे पालन केले जाते. नोकर भरती रनिंग रोस्टर प्रमाणे केले जाते. महा मेट्रो नवीन संस्था असल्याने विविध पदांवर अजून भरती झाली नाही. जेव्हा मेट्रोत मोठ्या प्रमाणात पद भरली होईल तेव्हा आरक्षणा संबंधीचे चित्र स्पष्ट होईल.

महा मेट्रो तर्फे रोजगार भरती दरम्यान कश्या प्रकारे आरक्षणाचे निकष पाळले जातात याचे उदाहरण म्हणजे महा मेट्रोने ३४ तंत्रज्ञ पदांकरिता काढलेली जाहिरात. यात १९ पदे अनारक्षित होती तर १५ पदे विविध आरक्षित जातींकरिता होती. पद भरतीत आरक्षणाच्या प्रश्नावर माननीय न्यायालयाने सातत्याने आदेश दिले आहेत. या शिवाय या संबंधी शासकीय निर्णय देखील दिले आहेत.

महा मेट्रोत विविध पदावर भरती करताना, न्यायालयाने दिलेले हे सर्व आदेश आणि सर्व शासकीय निर्णयाचे महा मेट्रोने तंतोतंत पालन केले आहे. या शिवाय आणखी एक महत्वाची बाब म्हणजे महा मेट्रोने स्थानिकांना नोकरीकरता सातत्याने दिलेले प्राधान्य. २०१७ मध्ये मेट्रोने २०६ विविध पदांकरिता जाहिरात काढली होती. या भरती प्रक्रियेतील सर्व उमेदवारांना नोकरीच्या अर्जासोबत महाराष्ट्राचे डोमीसाईल सादर करणे आवश्यक होते.

एवढेच नव्हे तर या पदांकरता सर्व पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा झाली होती आणि त्या परीक्षेत मराठी भाषेवर एक पेपर होता. इतर विषयांसोबतच मराठीच्या पेपर मध्ये उत्तीर्ण होणे देखील तितकेच आवश्यक होते. त्यामुळे ज्या उमेदवारांना मराठी भाषेचे ज्ञान होते, भाषेच्या या पेपरमध्ये उत्तीर्ण झाले

त्यांचाच परीक्षेतील इतर विषयात  मिळालेल्या गुणांचा आधार घेत निवड करण्यात आली.

स्थानिकांना रोजगार देण्याच्या मुद्द्यावर एक पाउल पुढे टाकत महा मेट्रोने अप्रत्यक्षपणे इतर संबंधित कंत्राटदारांमार्फत स्थानिकांना रोजगार मिळवून दिला आहे. त्यामुळे, एकीकडे महा मेट्रोने रोजगार देताना आरक्षणाचे सर्व निकष पाळले असून दुसरीकडे स्थानिकांना देखील नोकरीत प्राधान्य दिले आहे.

महा मेट्रो येथे २३ विविध विभागातील ८ श्रेणीच्या सहाय्यक व्यवस्थपाक ते कार्यक्रारी संचालक पदा पर्यंत पोस्ट आहेत. या भरतीमध्ये प्रत्येक विभागासाठी त्या संबंधीत पदाप्रमाणे अनुभव, शिक्षण आवश्यकता असते. त्यामुळे महा मेट्रो येथे २३ x८= १८४ कॅडर आहेत. या जागा चालू रोस्टर पद्धतीने त्या संबंधी कॅडर करता २०० गुणांच्या रोस्टरने भरल्या जातात.

आरक्षण आणि या सारख्या इतर संबंधित बाबींवर न्यायालयाने या आधी निर्देश दिले आहेत. केंद्र आणी राज्य सरकार तसेच न्यायालयाने दिलेल्या सर्व आदेशाचे तंतोतंत पालन आजवर महा मेट्रोने केले आहे आणि या पुढे देखील करेल.